महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
Commissionerate of Animal Husbandry, Maharashtra State,
स्पायसर मेमोरीयल कॉलेज समोर, औंध, पुणे:४११००७.
Opp. Spicer Memorial College, Aundh, Pune: 411 007
E-mail :cah.disectrl-mh@gov.in, cah.diseasecontrol@gmail.com
Fax No : 020-25690489
Telephones: 020-25690480; 81;85
Extn No: 239,240,241,242,243,244

जा. क्र. एसएलटी/निवेदन/४५/४५०/२०१६,पसं-१२,औंध, पुणे-७,   दिनांक : २२/०४/२०१६

**परिपत्रक**

प्रति,

१) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
२) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
३) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषयः-महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारित) कायदा,१९९५ अंतर्गत जप्त केलेले मांस नमूने तपासणी होणेसाठी राज्यात कार्यरत न्यायसहाय्यक वैज्ञानीक प्रयोगशाळांची माहिति क्षेत्रियस्तरावर होणेबाबत....

संदर्भः- प्र.संचालक, न्या.वै. प्र., यांचे पत्र क्र. मु.का/२३६५-७०/१६ दि.०६/०४/२०१६

महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारित) कायदा, १९९५ या कायद्यातील कलमांबाबत आपणांस यापूर्वीच अवगत करण्यात आले आहे. या कायद्यांतर्गत तरतूदींचे उल्लंघन झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास पोलीसांमार्फत गोवंशीय जनावरे किंवा मांस जप्त केले जाते. सदर मांसाची गायवर्गीय कि म्हैसवर्गीय याची खात्री करणे आवश्यक असते. असे वर्गीकरण न्यायसहाय्यक प्रयोगशाळांकडून करुन घेणे क्रमप्राप्त आहे.अटक केलेल्या आरोपींवरील आरोप सिध्द करुन दोषी ठरविण्यासाठी या प्रयोगशाळांचा सक्रिय सहभाग व तत्पर कार्यवाही यांची आवश्यकता आहे.

यासाठी या कार्यालयाने विनंती केल्याप्रमाणे न्यायसहाय्यक वैज्ञानीक प्रयोगशाळा संचालनालयाकडून राज्यातील ज्या प्रयोगशाळामध्ये गायव म्हैस यांचे मांस ओळखणे व वर्गीकरण करण्यासाठी शासन प्राधीकृत असलेल्या न्यायसहाय्यक वैज्ञानीक प्रयोगशाळांची व त्याअंतर्गत येत असलेल्या जिल्हयांची माहिती त्यांच्या संदर्भीय पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर पत्राची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. तसेच प्रयोगशाळेत मांसाचे नमूने पाठविताना घ्यावयाच्या काळजीबाबत न्यायसहाय्यक वैज्ञानीक प्रयोगशाळेचे पत्रही सोबत जोडण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत कि, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी या कायद्यातील तरतूदींअंतर्गत गुन्हा अजामीनपात्र असल्याने व दाखल गुन्हयांतील जप्त मांस कोणत्या जनावराचे आहे याची तपासणी सोबत जोडलेल्या यादीतील प्रयोगशाळांकडून तत्परतेने करण्यात यावी. सदर कायद्यांतर्गत घडणाऱ्या केसेसमधील प्राप्त मांस नमून्यांची तपासणी प्राथमिकतेने या प्रयोगशाळांमार्फत करुन घेण्यासाठी या सर्व प्रयोगशाळांची माहिती आपल्या अधिनस्त पशुसंवर्धन विभागीतल सर्व संस्था, पोलीस विभाग, महसूल विभाग, परिवहन विभाग यांचेकडील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना पोहच होईल, याची खबरदारी घ्यावी तसेच सदर मांसाचे नमूने प्रयोगशाळेत योग्य स्वरुपात सादर होतील, याची दक्षता घेण्यात यावी.

आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य,औंध, पुणे-७

प्रत, संदर्भीय पत्राच्या प्रतीसह माहितीस्तव सविनय सादर,

१. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदे संनियंत्रण समिती, १९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-४११ ०३२
२. मा. प्रधान सचिव, (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. प्रधान सचिव, (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१३१५

(विशेष-न्या.वै.प्र.-३) (Spl.F.S.L.-3)

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय
DIRECTORATE OF FORENSIC SCIENCE LABORATORIES
गृह विभाग, महाराष्ट्र राज्य,
HOME DEPARTMENT, MAHARASHTRA STATE
दूरध्वनी : ०२२-२६६७०७५५/५८ तार : क्रिमिनॅलिस्टिक्स
Tel. : 022-26670755/58 Telegram: CRIMINALISTICS
फॅक्स : ०२२-२६६७०८४४ FAX : 022-26670844

विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग
VIDYANAGARI, HANS BHUGRA MARG
सांताक्रुझ (पूर्व)
SANTACRUZ (EAST)
मुंबई - ४०० ०९८
MUMBAI - 400 098

पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य औंध, पुणे-०७
13 APR 2016
आवक शाखा क्र. 92
आवक क्र. 6904

क्रमांक/No. : मुं.का/२३६५-७०/१६

दिनांक/Date : 06 APR 2016

प्रति,
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, औंध,
पुणे - ७

विषय:- महाराष्ट्र प्राणीरक्षण (सुधारित) कायदा १९९५ अंतर्गत जप्त केलेल्या मांस नमुने तपासणीबाबत.

संदर्भ:-१) आपले पत्र क्र. एसएलटी/मांस/५०१/१२४६/२०१५/पसं-१२ दि. १०/०९/१५
२) एसएलटी/निवेदन/३१/३५०/२०१६ पसं-१२ औंध, पुणे दि. ०९/०३/१६

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रान्वये महाराष्ट्र प्राणीरक्षण (सुधारित) कायदा १९९५ अंतर्गत गोवंशीय जनावरांचे मांसाचे डि.एन.ए. विश्लेषण खाली नमूद केलेल्या न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे केले जाते.

| प्रयोगशाळा | प्रयोगशाळा अंतर्गत जिल्हे |
|---|---|
| न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रुझ (पूर्व), गृह विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०० ०९८ | मुंबई, नवीमुंबई, ठाणे, रायगड, पालघर, नाशिक, धुळे, जळगाव, नंदूरबार, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, लातुर, उस्मानाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली. |
| प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, गणेशखिंड राज भवनसमोर, पुणे - ४११००७ | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, रहाटे कॉलनी चौक धंतौली, नागपूर - ४४००१२ | नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा |

महत्त्वाच्या संवेदनशिल प्रकरणाचे अहवाल त्वरीत तपासी यंत्रणेला दिले जातात.

१३/४ 13/4 16/4 16/4

सबब माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर.

आपला विश्वासू,

(श्री. बा. ब. दौंडकर)
प्रभारी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा म.शा.,
आणि शासकीय रासायनिक विश्लेषक.

सस्नेह प्रत -
१. मा.प्रधान सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय मुंबई - ३२
२. मा.प्रधान सचिव, कृषी व पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय व्यवस्थापन, मंत्रालय, मुंबई - ३२
३. मा.पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र प्राणी कल्याण कायदे संनियंत्रण समिती, प्रशासकीय इमारत, १९ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ३२
५. महासंचालक (न्यायिक व तांत्रिक), महाराष्ट्र शासन, मुंबई.

# DIRECTORATE OF FORENSIC SCIENCE LABORATORIES

STATE OF MAHARASHTRA, HOME DEPARTMENT, VIDYANAGARI, KALINA,
SANTACRUZ (EAST), MUMBAI, 400 098
TEL: 022-26670755/58 FAX: 022-26670844


---

## Guideline for Investigation Officer

### How to preserve muscle sample of cow/bullock/buffalo etc.

1. Take 50gms of muscle pieces put in a sterile plastic container (size 100 ml) put the seal of Veterinary Medical Officer and label it with details of police station, C.R.No., IPC with the signature of witness and veterinary medical officer. Specimen of label is as follow.

| |
|---|
| Police Station : |
| C. R. No. : |
| IPC : |
| Witness Sign : |
| Veterinary Medical Officer sign : |

2. Use preservative common salt for meat pieces.
3. Do not use any other preservation.
4. Store the meat sample at $4^{\circ}C$ temperature and carry the sealed meat sample kept in ice pack & deposit the meat sample in the laboratory.

If above precautionary measure are not taken for preservation of the sample then such sample will be not accepted in laboratory for DNA analysis

---

### डि.एन.ए साठी गाय / बैल / म्हैस यांच्या नमुन्यांची घ्यावयाची काळजी

१. ५० ग्रॅम जनावराचे मांस १०० मि.ली. च्या निर्जंतुक प्लास्टिकच्या डब्यात घ्या.
२. मांस जतन करण्यासाठी साधे मीठ वापरा.
३. इतर कोणतेही परीरक्षक द्रावण वापरु नये.
४. मांस फ्रिज मध्ये ४°C ला ठेवावे.
५. प्लास्टिकच्या डबीवर खालील मजकूर लिहून डबीवर चिटकवणे.
प्लास्टिकच्या डबीवर पशू वैदयकीय अधिकारी यांचे सील लावावे

| |
|---|
| पोलीस स्टेशन : |
| C. R. No. : |
| IPC : |
| पंचांच्या स्वाक्षरी : |
| पशू वैदयकीय अधिकारी सही : |

६. सॅम्पल प्रयोगशाळेत आणताना शीतपेटीत आणावे ( थंड राहिल याची काळजी घ्यावी. )
* सुचना - वरील प्रकारे मुद्देमालाची काळजी न घेतल्याचे आढळून आल्यास सदर मुद्देमाल डि.एन.ए. विश्लेषणासाठी स्विकारले जाणार नाही याची नोद घ्यावी.